अत्यंत तातडीचे /सर्वप्राथम्य

जा.क्र.युआरबी-१/९७ वी घ.दु./व अध्यादेश/२०१३
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,जळगांव यांचे
कार्यालय,जळगांव दिनांक :- १३/३/२०१३

प्रति,
१] उप/सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था ________________[सर्व]
२] अध्यक्ष/ मुख्य कार्यलक्षी अधिकारी / व्यवस्थापक,
जळगाव जनता बँक

विषय:- २०१३ च्या महाराष्ट्र अध्यादेश क्र. २ च्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये झालेल्या सुधारणा.

संदर्भ:- मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जा.क्र.प्रशासन/९७ वी घ.दु. व अध्यादेश-२/२०१३ दिनांक ११/३/२०१३ चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविणेत येते की,

२/- ९७ व्या घटनादुरुस्तीच्या अनुषगाने कायद्यातील बदल सर्व सहकारी संस्थांचे सभासद सर्वसामान्यांपर्यत पोहचविण्याकरीता प्रचार व प्रसिध्दी करणेस्तव तयार करण्यात आलेली टिपणी सोबत जोडून पाठवीत आहे. कायद्यातील बदलांनुसार करावयाच्या कार्यवाहीचे विहित वेळापत्रकानुसार कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उप/सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था यांनी सदर टिपणी त्यांचे तालुक्यात मुख्यालय असलेल्या सर्व सहकारी संस्थांना तात्काळ पोहोच करावयाची आहे व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावयाचा आहे.

जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जळगावकरीता

म.अध्यक्ष/म.संचालक मंडळ
यांज कडे सादर

व्यवस्थापकीय संचालक

Jalgaon Janata Sah. Bank Ltd.
(Scheduled Bank) Head Office Jalgaon
13 MAR 2013
INWARD NO. 7736
Banking Officer

C:\Documents and Settings\ADMIN\Desktop\१३३२०१३.doc

जा.क्र.प्रशासन/९७वी घ.दु.व अध्यादेश-२/२०१३
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
दिनांक : ११ /३ /२०१३

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सर्व.
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व.

**विषय- २०१३ च्या महाराष्ट्र अध्यादेश क्र. २ च्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये झालेल्या सुधारणा**

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मध्ये दि. १४ फेब्रुवारी २०१३ च्या शासनाच्या अध्यादेशाव्दारे महत्त्वपूर्ण बदल करण्यात आलेले असून या बदलांची माहिती सहकारी संस्थांच्या अधिकारी , पदाधिकारी तसेच सभासद आणि इतर आम जनतेपर्यंत पोहचविण्याकरिता राज्यात विविध ठिकाणी परिसंवाद / कार्यशाळा तसेच प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले. तसेच, आपणासही घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने कायदयातील बदल सहकारी संस्थांचे सभासद तसेच, सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याकरिता प्रचार व प्रसिध्दी करणेस्तव सूचित करण्यात आले होते. या पत्रासोबत सर्व सहकारी संस्थांचे पदाधिकारी / अधिकारी यांचे माहितीकरिता कायदयातील महत्त्वपूर्ण बदलांची टिपणी पाठवित आहोत. आपले अधिनस्त सर्व सहकारी संस्थांकडे सदरची टिपणी / माहिती अत्यंत अल्प कालावधीत आपणास पोहचवयाची आहे. या संबंधीच्या कार्यवाहीचा अहवाल तसेच, कायदयातील बदलांनुसार करावयाच्या कार्यवाहीचे विहित वेळापत्रकानुसार आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयाकडे सादर करावा.

(मधुकर चौधरी)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

जा.क्र.प्रशासन/९७वी घ.दु.व अध्यादेश-२/२०१३
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
दिनांक : ११/३/२०१३

प्रति,

अध्यक्ष,
सहकारी संस्था, सर्व.

**विषय- २०१३ च्या महाराष्ट्र अध्यादेश क्र. २ च्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये झालेल्या सुधारणा**

९७व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये अनुषंगिक बदल करणेसाठी महाराष्ट्र शासनाने दि. १४/२/२०१३ रोजी कायदयातील दुरुस्तीसंबंधीचा अध्यादेश जारी केला आहे. कायदयात नव्याने झालेल्या बदलांची दखल तत्परतेने घेऊन तातडीने आवश्यक ती कार्यवाही सर्व सहकारी संस्थांकडून व्हावी हया दृष्टीने या तरतुदींची थोडक्यात ओळख खालील प्रमाणे करुन देण्यात येत आहे.

**१. संचालक मंडळ सदस्य संख्या-**

कायदयातील नवीन बदलानुसार सहकारी संस्थेवरील संचालक मंडळ सदस्य संख्येची कमाल मर्यादा २१ करण्यात आलेली आहे. याचाच अर्थ कोणत्याही सहकारी संस्थेचे संचालक मंडळावर २१ पेक्षा जास्त संचालक निवडून येणार नाहीत. संस्थेच्या उपरोक्त नमूद संचालकांशिवाय संस्थेच्या संचालक मंडळास २ तज्ञ (Expert Director) तसेच एक किंवा दोन कार्यलक्षी संचालकांना (Functional Director) संचालक मंडळावर स्विकृत करुन घेता येईल.

संस्थेने स्विकृत केलेला तज्ञ संचालक हा संस्थेची उद्दिष्टये आणि कार्य यांच्याशी संबंधित क्षेत्रातील जाणकार व्यक्ती असेल. जेव्हा संस्थेच्या समिती सदस्यांची संख्या १७ पेक्षा अधिक असेल तेव्हा संचालक मंडळ आणखी एका कार्यलक्षी संचालकाची स्विकृती करु शकेल.

स्विकृत करण्यात आलेल्या तज्ञ संचालकांना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असणार नाही. मात्र संस्थेच्या समिती सभेच्या इतर सर्व विषयासंबंधी त्यांना मत देता येईल.

कार्यलक्षी संचालकांना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार असणार नाही. तसेच, समिती सभेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकी व्यतिरिक्त इतर विषयांवरील ठरावांमध्ये त्यांना मत देता येणार नाही. मात्र समिती सभेत आलेल्या अशा ठरावासंबंधी सभेत ते आपले म्हणणे (Opinion) मांडू शकतील तसेच अशा ठरावासंबंधी अभिप्राय नोंदवू शकतील.

नैमित्तिक कारणाने समितीतील रिक्त होणाऱ्या पदासंबंधी तसेच पदाधिकाऱ्यांच्या रिक्त होणाऱ्या पदासंबंधी समितीला १५ दिवसांचे आत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे कळविणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, यांनी विनिर्दिष्ट केलेल्या आदर्श उपविधीमध्ये संचालक मंडळाची सदस्य संख्या संस्थेचे एकूण व्यवहार व कामकाजाचे स्वरुप लक्षात घेऊन निश्चित करुन दिलेली आहे.

**२.संस्थेच्या समितीवरील आरक्षित पदे-**

सहकारी संस्थांच्या व्यवस्थापन समितीवर खालील प्रमाणे आरक्षित पदे राहतील

| | |
|---|---|
| १. अनुसुचित जाती / जमाती | १ पद |
| २. भटक्या विमुक्त जाती व जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग | १ पद |
| ३. इतर मागास वर्ग | १ पद |
| ४. महिला प्रतिनिधी | २ पदे |

**३. क्रियाशील सभासद आणि अक्रियाशील सभासद-**

सध्याच्या कायदयातील क्रियाशील सभासदाची नव्याने केलेली तरतूद अत्यंत महत्त्वपूर्ण असून ज्या सभासदांनी मागील सलग पाच वर्षामध्ये किमान एक सर्वसाधारण सभेस हजेरी लावलेली आहे आणि ज्या सभासदाने मागील सलग पाच वर्षात किमान एका वर्षी तरी संस्था पुरवित असलेल्या किमान सेवांचा लाभ घेतला असेल अशा सभासदांना क्रियाशील सभासद संबोधण्यात येईल. संस्थेच्या आदर्श उपविधीमध्ये किंवा आदर्श उपविधी विनिर्दिष्ट केलेले नसल्यास निबंधकाने मान्य केलेल्या उपविधीमध्ये यासंबंधीची स्पष्ट तरतूद असेल. जे सभासद, क्रियाशील सभासदांकरिता उपविधीमध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणार नाही अशा सभासदांचे संस्था अक्रियाशील सभासद म्हणून वर्गीकरण करेल व असे वर्गीकरण केल्यास आर्थिक वर्ष संपल्यानंतर तीस दिवसांचे आत अशा सभासदाला त्याची कल्पना देणे बंधनकारक करण्यात आले आहे. संस्थेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा तसेच संस्थेच्या सर्वसाधारण सभेत कामकाजात सहभागी होऊन मतदान करण्याचा अधिकार केवळ क्रियाशील सभासदालाच राहणार आहे.

अक्रियाशील सभासद संस्थेच्या निवडणुकीत मतदान करु शकणार नाहीत. अक्रियाशील सभासद सर्वसाधारण सभेत उपस्थित राहू शकतील.

एखादा सभासद क्रियाशील अथवा अक्रियाशील असण्याचा वाद उद्भवल्यास असे वर्गीकरण केल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत संबंधित सभासदाला निबंधकाकडे अपील करता येईल.

४.संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा-

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा प्रतिवर्षी दि. ३० सप्टेंबरपर्यंत घेणे बंधनकारक करण्यात आलेले असून कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्याची तरतुद विद्यमान सुधारीत कायदयात नाही.

वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे काही विवरणपत्रे ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले असून त्यापैकी महत्त्वाचे म्हणजे समिती सदस्यांपैकी कोणत्याही सदस्यास किंवा कोणत्याही समिती सदस्यांच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास दिलेल्या कर्जांचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र तसेच आधीच्या लेखापरीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल व पुढील वर्षासाठीचा वार्षिक अर्थसंकल्प इ. इ.. वार्षिक सर्वसाधारण सभेत चालू वर्षाचे लेखापरीक्षणकरिता शासनमान्य व शासनाने प्रसिध्द केलेल्या नामतालिकेवरील (Panel) लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे अनिवार्य आहे.

सहकारी संस्थेने किंवा तिच्या अधिकाऱ्याने किंवा सदस्याने हेतूतः खोटे विवरणपत्र तयार केले किंवा कलम ७५ किंवा ७९ खाली विवरण पत्र देण्यात कसूर केली तंर जबाबदार व्यक्तींना रुपये पाच हजार पर्यंत दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

५. विद्यमान कायदयातील सुधारीत कलम ७९ मधील दुरुस्तीनुसार सादर करावयाची विवरणपत्रे-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये झालेल्या दुरुस्तीनुसार संस्थेने निबंधकाकडे आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत खालील विवरणपत्रे सादर करणे अनिवार्य करण्यात आलेले असून यात कसूर करणाऱ्या किंवा चुकीचे विवरणपत्र सादर करणाऱ्या जबाबदार अधिकारी / समिती सदस्यास रुपये पाच हजार पर्यंत दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

- संस्थेच्या कार्याची माहिती देणारे विवरणपत्र.
- लेखापरीक्षण अहवाल.
- नफा वाटणी.
- उपविधी दुरुस्ती (असल्यास)
- वार्षिक सभेची तारीख / निवडणूक असल्यास तारीख
- निबंधकाने कायदा / नियम / उपविधीतील तरतुदी अनुषंगाने मागणी केलेली माहिती.
- नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकाचे नाव तसेच त्याची संमती.

६. संस्थांचे लेखापरीक्षण-

संस्थेने संस्थेच्या लेख्याचे वर्षातून एकदा लेखापरीक्षण करुन घेणे अनिवार्य करण्यात आलेले असून चालू वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. नेमलेला लेखापरीक्षक हा शासनाने मान्य केलेल्या पॅनेलवरील असणे आवश्यक आहे.

संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यावर सहा महिन्यांच्या आत लेखापरीक्षण पूर्ण होणे आवश्यक असून असे न केल्यास निबंधक अशा संस्थेचे लेखापरीक्षण लेखापरीक्षकांची नियुक्ती करुन पूर्ण करेल.

संस्थेच्या सर्वसाधारण सभेने संस्थेचे लेखापरीक्षण करणे करीता नेमलेल्या लेखापरीक्षकाने संस्थेचे यापूर्वी सलग तीन वेळा लेखापरीक्षण केलेले नसावे. तसेच सर्वसाधारण सभेत करावयाची लेखापरीक्षकाची नियुक्ती ही केवळ एकाच म्हणजे चालू आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्याकरीता असेल.

**७. सहकार शिक्षण व प्रशिक्षण-**

संस्थेच्या प्रत्येक समिती सदस्यास (निवडून आलेल्या किंवा स्वीकृत केलेल्या) सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण अनिवार्य करण्यात आलेले आहे. याचप्रमाणे प्रत्येक संस्था राज्यशासन विनिर्दिष्ट करील अशा राज्य संघीय संस्था किंवा राज्य प्रशिक्षण संस्थेमार्फत आपले सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांचेकरिता सहकार शिक्षण व प्रशिक्षण आयोजित करील अशी तरतूद कायदयात नव्याने करण्यात आलेली आहे.

**८. तक्रार निवारण समिती -**

संस्था सभासदांच्या तक्रारींवर विचार करण्यासाठी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत तीन क्रियाशील सभासदांच्या समितीची नियुक्ती करण्यात येईल आणि या समितीचा सभापती हा जेष्ठ सदस्य असेल. या समितीकरिता स्वतंत्र व नि:पक्षपाती आणि अनुभवी सदस्याची नियुक्ती करणे अपेक्षित आहे.

कोणत्याही सदस्यांचे ,माजी सदस्यांचे किंवा मृत सदस्यांचे कायदेशीर प्रतिनिधीशी किंवा संस्थेचे त्या संस्थेच्या कोणत्याही गाऱ्हाणे या समितीपुढे मांडता येईल. मात्र सदरच्या पक्षकाऱ्यांचे समझोत्याने व सामोपचाराने गाऱ्हाणे मिटविण्यास अथवा तडजोड करण्यास सहमती असली पाहिजे.

तक्रार निवारण समिती अशा गाऱ्हाण्यांवरील निकाल तीन महिन्यांमध्ये देईल.

**९. थकबाकीदार सभासदांना संस्थेच्या कामकाजात मतदानाचा अधिकार नाही-**

कायदयाच्या कलम २७(१०) मधील हा एक महत्त्वाचा बदल असून आता संस्थेच्या थकबाकीदाराला संस्थेच्या कामकाजात मतदानाचा अधिकार असणार नाही. म्हणजेच संस्थेच्या निवडणुकीमध्येही थकबाकीदार सभासद मतदान करु शकणार नाहीत. पूर्वी ही तरतूद केवळ कृषी पतपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थांनाच लागू होती. मात्र आता सर्वच प्रकारच्या सहकारी संस्थांना ती लागू करण्यात आलेली आहे.

**१०. संचालक मंडळाचे निलंबन-**

संचालक मंडळाच्या निलंबनाची तरतूद नव्याने करण्यात आलेली आहे. समिती तिची कर्तव्य पार पाडण्यात सातत्याने कसूर किंवा निष्काळजीपणा करत असेल किंवा समिती सदस्यांचा राजीनामा इ. कारणांमुळे संस्थेची सदस्य समिती सहा महिने कालावधीपर्यंत निलंबित केली जाऊ शकते आणि अशा

संस्थेवर तिचा कारभार चालविण्यासाठी निबंधक समितीच्या जागी प्रशासक किंवा तीन किंवा अधिक सदस्यांची प्रशासक समिती नेमू शकेल.

मात्र शासनाने संस्थेस रोख रकमेच्या स्वरुपात किंवा अन्य प्रकारे वित्तीय सहाय्य दिलेले नसेल किंवा शासनाने संस्थेचे भाग धारण केलेले नसतील किंवा संस्थेकरिता कोणतीही हमी दिली नसेल तर अशा संस्थांचे संचालक मंडळ निलंबित करण्याचा अधिकार निबंधकास असणार नाही.

**११. इतर महत्त्वाचे बदल-**

१. बिगर शेती कर्जांची दामदुप्पट मर्यादा रुपये ३०००/- वरुन रुपये १००००/- करण्यात आली आहे.(कलम ४४ अ).

२. अक्रियाशील सभासद म्हणून वर्गीकरण झाल्यापासुन पुढील ५ वर्षात सभासद क्रियाशील न झाल्यास अशा सभासदाची हकालपट्टी (कलम २६(२) आणि कलम ३५)

३. सहकारी गृहनिर्माण संस्थांचे देखभाल, सेवाशुल्क आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्थांचे वैयक्तिक कर्ज वसुल करण्याकरिता कलम १०१ मध्ये वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी नव्याने तरतूद.

४. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा कालावधी निवडणुकीच्या दिनांकापासून ५ वर्ष.

५. अपीलामध्ये स्थगिती दिल्यास पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत दावा निकाली काढण्याची तरतूद- कलम १५२(२).

६. रिव्हीजनमध्ये अंतरिम आदेश दिल्यास पुढील सहा महिन्यांत अंतिम आदेश अथवा पूर्वीचाच आदेश अंतिम करण्याची तरतूद - कलम १५४(३-अ).

७. अवसायकाने ॲवार्ड दिलेल्या दाव्यांमध्ये ५० टक्के रकमेचा भरणा केल्याशिवाय स्थगिती नाही.

विद्यमान कायदयातील थोडक्यात वर नमूद केलेल्या सुधारणांच्या पार्श्वभूमीवर सहकार आयुक्त तथा निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे, यांनी काही प्रमुख प्रकारच्या सहकारी संस्थांचे आदर्श उपविधी (Model Bye-laws) तयार केलेले असून संस्थांच्या सुलभ संदर्भासाठी सहकारआयुक्तांच्या वेबसाइट (sahakarayukta.maharashtra.gov.in) वर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सहकारी संस्थांना त्यांचे उपविधी सुधारीत करण्यास्तव या आदर्श उपविधींचा उपयोग करुन घेता येईल.

वरील पार्श्वभूमीवर संस्थांकडून तातडीने खालीलप्रमाणे समयबध्द पध्दतीने कार्यवाही होणे आवश्यक राहील.

- सर्व सहकारी संस्थांनी त्यांचे विद्यमान उपविधी सुधारीत कायदयाच्या तरतुदींशी सुसंगत व आदर्श उपविधीच्या अनुषंगाने तयार करणे.
- उपविधीच्या मसुद्यास तातडीने संचालक मंडळाची मान्यता घेवून तदनंतर विशेष सर्व साधारण सभेची मान्यता घेणे. (सदर कार्यवाही १५ एप्रिल पर्यंत होणे अपेक्षित आहे.)

- उपविधी दुरुस्तीच्या प्रयोजनार्थ बोलाविण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत लेखापरीक्षकाची निवड तसेच नियुक्ती करणे (शासनाने निश्चित केलेल्या लेखापरीक्षकांची नामिका (panel of auditors) ही दिनांक ३१/३/२०१३ पावेतो सहकार आयुक्तांच्या वेबसाईटवर उपलब्ध होईल)
- विशेष सर्वसाधारण सभेने मान्य केलेले सुधारीत उपविधी संबंधीत निबंधकांकडे मान्यतेस्तव सादर करणे. (दि.२०/४/२०१३ पावेतो)

सर्व संबंधीत सहकारी संस्थांचे अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांनी वरील सुचनांची दखल घेवून तातडीने आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षित आहे. या संदर्भात काही शंका असल्यास संबंधीत जिल्हा उपनिबंधक किंवा आयुक्त कार्यालयास संपर्क साधावा अशी विनंती करण्यात येते

(मधुकर चौधरी)
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

सुलभ संदर्भासाठी सहकार आयुक्त कार्यालयाची वेबसाईट पहावी
**(sahakarayukta.maharashtra.gov.in)**